# तज्ञांद्वारा तांत्रिक सहाय्य

Concrete Xpert




आमची फिरती व्हॅन '**कॉंक्रीट एक्सपर्ट**' द्वारे
ग्राहक खालील ऑन–साईट तांत्रिक सेवांचा* लाभ घेऊ शकतात:

1 **स्लंपकोन चाचणी:**
**नव्याने बनविलेल्या कॉंक्रिटच्या कार्यशीलतेची खात्री करून घेण्यासाठी**



2 **कॉम्प्रेसिव स्ट्रेंथ चाचणी:**
**घट्ट झालेल्या कॉंक्रिटच्या टिकाऊ क्षमतेची खात्री करून घेण्यासाठी**



3 **नॉन–डिस्ट्रक्टिव चाचणी**
**(रिबाऊंड हॅमर चाचणी): घट्ट झालेल्या कॉंक्रिटसाठी**



*(*निवडक ठिकाणी)*

तांत्रिक सेवांचा लाभ घेण्यासाठी,
कृपया तुमच्या स्थानिक डीलरशी संपर्क साधा.

**अधिक माहितीसाठी कृपया QR कोड स्कॅन करा**

## Birla·A1 StrongCrete
### The Forever Cement

**कॉर्पोरेट कार्यालय: दिल्ली**

**ओरिएन्ट सिमेंट लिमिटेड,** बिरला टॉवर, 3रा मजला,
25, बाराखंबा रोड, नवी दिल्ली – 110001
दूरध्वनी: +91 11 42092100 | फॅक्स: +91 11 41092198

**नोंदणीकृत कार्यालय: भुबनेश्वर**

**ओरिएन्ट सिमेंट लिमिटेड,** युनिट VIII, प्लॉट क्र.7,
भोईनगर, भुवनेश्वर, ओडिशा – 751012
कॉर्पोरेट ओळख क्रमांक: L26940OR2011PLC013933

**मार्केटिंग कार्यालय: हैदराबाद**

**ओरिएन्ट सिमेंट लिमिटेड,** 5-9-22/57/डी
2रा, 3रा आणि 4था मजला, जी.पी.बिरला सेंटर
आदर्श नगर, हैदराबाद, तेलंगणा–500063
दूरध्वनी: +91 40 23688600 । फॅक्स: +91 40 23688654
ई–मेल: info@orientcement.com

आम्हाला फॉलो करा: birlaa1.com | orientcement.com
आम्हाला विजिट करा: /BirlaA1PremiumCement | /company/orientcement | /BirlaA1
/birlaa1premiumcement | /Birla A1 Premium Cement-Official

CK BIRLA GROUP

ORIENT CEMENT

# आता, एक सिमेंट जे निर्माण करते वारसा






## Birla·A1 StrongCrete
### The Forever Cement

# भविष्याच्या नवनिर्माणसाठी

देशाच्या उभारणीच्या 35+ वर्षाच्या भव्यदिव्य कारकीर्दीसह, ओरिएन्ट सिमेंट लिमिटेड गुणवत्ता आणि विश्वासाचे प्रतिक बनली आहे. आमचा प्रमुख ब्रँड बिरला.A1 प्रिमियम सिमेंटने ग्राहकांच्या मनात एक सर्वाधिक लोकप्रिय ब्रँड म्हणून स्थान मिळविले आहे.

आमच्या ग्राहकांना सर्वोत्तम दर्जाची उत्पादने सादर करण्याच्या आमच्या प्रयत्नाचा भाग म्हणून आम्ही काँक्रिटच्या उपयोगासाठी खास सिमेंट – **बिरला.A1 स्ट्राँगक्रिट** अभिमानाने सादर करत आहोत.

Birla·A1 StrongCrete
The Forever Cement

## बिरला.A1 स्ट्राँगक्रिट का?

लोड-बेअरिंग काँक्रिट बांधकाम हा घराचा सर्वाधिक महत्त्वाचा भाग असतो आणि म्हणून त्यासाठी खास सिमेंटची गरज असते जे अतिशय उच्च प्रमाणातील दाब आणि हवामानातील खडतर बदल सहन करू शकेल.

**बिरला.A1 स्ट्राँगक्रिट काँक्रिटच्या उपयोगासाठी अगदी योग्य आहे**




## काँक्रिटची गुणवत्ता सिमेंटच्या गुणवत्तेवर अवलंबून असते

काँक्रिट हे सिमेंट, पाणी, बारीक ॲग्रिगेट (वाळू) आणि भरड ॲग्रिगेट (ग्रॅवेल) यांचे मिश्रण असते. काँक्रिटची मजबुती मुख्यत्वे त्यात वापरलेल्या सिमेंटच्या मजबुतीवर अवलंबून असते कारण ते प्रमुख घट्ट बांधून ठेवणाऱ्या साहित्याचे काम करते.

*ॲग्रिगेटच्या गुणवत्तेवर देखील काँक्रिटची गुणवत्ता अवलंबून असते.*
*घर बांधण्यासाठी M20 श्रेणीच्या काँक्रिटला प्राधान्य दिले जाते.*

**बिरला.A1 स्ट्राँगक्रिट** हे काँक्रिटच्या उपयोगासाठी अधिक योग्य आहे.

# बिरला.A1 स्ट्राँगक्रिट ची खास वैशिष्ट्ये

- उच्च जलद मजबुती
- जलद सेटिंग टाइम
- अधिक घट्ट काँक्रिट
- क्रॅक प्रतिरोधक
- गंज अवरोधक
- PST® (प्रेशर सस्टेनिंग टेक्नॉलॉजी)





## अधिक मजबुती


### उच्च जलद मजबुती

काँक्रिटची मजबुत होण्याची प्रक्रिया हळूहळू होणारी असते. **बिरला.A1 स्ट्राँगक्रिट** नेहमीच्या सिमेंटच्या तुलनेत जलद उच्च प्रमाणात मजबुती साध्य करून देते. काँक्रिटच्या उच्च जलद मजबुतीमुळे फॉर्मवर्क (डि-शटरिंग), लवकर काढता येते त्यामुळे बांधकामाला लागणाऱ्या वेळेत बचत होते.

### उच्च अंतिम मजबुती

**बिरला.A1 स्ट्राँगक्रिट** ने बनविलेले काँक्रिट कास्टिंगनंतर सुरुवातीच्या 28 दिवसांच्या कालावधीत अपेक्षित कॉंप्रेसिव मजबुती साध्य करते. त्याच्या अत्याधुनिक मिश्रणामुळे **बिरला.A1 स्ट्राँगक्रिट** त्यानंतर देखील अधिकाधिक मजबुती साध्य करते.




## जलद सेटिंग टाइम

**बिरला.A1 स्ट्राँगक्रिट**च्या जलद सेटिंग टाइममुळे फॉर्मवर्क लवकर काढता येते आणि त्यामुळे बांधकाम वेगाने होते.

## अधिक टिकाऊपणा

### क्रॅक प्रतिरोधक

कमी हीट ऑफ हायड्रेशनमुळे **बिरला.A1 स्ट्राँगक्रिट** घराच्या बांधकामाला थर्मल क्रॅकसारखी हानी पोहोचण्यापासून रक्षण करते.

### गंज अवरोधक

डबल कॅल्शियम-सिलिकेट-हायड्रेट जेल (C-S-H) रचनेमुळे **बिरला.A1 स्ट्राँगक्रिट** रिबार्सचे (रिइन्फोर्सड स्टील बार्स) रक्षण करते, आणि त्याद्वारे बांधकामाचे आयुर्मान वाढविते.

### OptiMix18™ च्या शक्तीमुळे बिरला.A1 स्ट्राँगक्रिट अधिक मजबूत बनते

**बिरला.A1 स्ट्राँगक्रिट** काँक्रिटला अधिक योग्य बनविण्यासाठी, आम्ही सिमेंटचे घटक अधिक अनुकूल केले आहेत. ह्यात त्याचा अधिक सूक्ष्मपणा, पार्टिकल साईजचे वितरण आणि त्याच्या मिश्रणात असलेल्या खनिजांचे प्रमाण यांचा समावेश आहे. ह्या घटकांच्या योग्य प्रमाणामुळे त्याद्वारे करण्यात येणारे बांधकाम अधिक मजबूत बनते.

## बिरला.A1 स्ट्राँगक्रिट PST PRESSURE SUSTAINING TECHNOLOGY ने बनले आहे

*PST® बद्दल अधिक माहिती जाणून घेण्यासाठी, येथे भेट द्या: www.birlaa1.com/pst.html*

**बिरला.A1 स्ट्राँगक्रिट खास बनविलेल्या LPP (लॅमिनेटेड पॉलिप्रॉपिलिन) बॅगसमध्ये येते ज्यामध्ये खालील फायदे आहेत –**

- फेरफार-प्रतिबंधक- सिमेंटचे अजिबात नुकसान होऊ नये यासाठी
- आर्द्रता-प्रतिबंधक – सिमेंट ताजे ठेवण्यासाठी

*टीप: साईटवर बॅग्स हाताळताना हुक्सचा उपयोग करू नये.*